# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in    दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४  email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./3216/२०२२    दि. ~~/०९/२०२२~~ 7-10-2022

## परिपत्रक

**विषय:- राष्ट्र पुरुष/ थोर व्यक्तींचे जयंती दिन व अन्य राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत.**

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र जपुती २२२१/प्रक्र ११२/भाग-१/कार्या-२९, दि. ०५/०९/२०२२.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, राष्ट्र पुरुष / थोर व्यक्तींची जयंती व राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम साजरे करण्याबाबत संदर्भिय शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने सर्व संबंधितांनी संदर्भिय शासन परिपत्रकाचे अवलोकन करुन त्यामध्ये नमुद केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही घ्यावी.

संलग्न - वरीलप्रमाणे

**(डॉ. अनिल हिरेखण)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेषीत:-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४. डॉ. नंदकिशोर मने, सहाय्यक प्राध्यापक तथा समन्वयक, राष्ट्र पुरुष/ थोर व्यक्ती यांची जयंती/पुण्यतिथी कार्यक्रम, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
६. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 4022 दि. 21/9/22
आवक क्र. दि.
3137 - 17-9-2022

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
१९ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२-२२८८१८९२ Email : sunil.tumram@nic.in

क्र. जपुती २२२१/प्र.क्र.११२/भाग-१/कार्या-२९ दिनांक : ०७ सप्टेंबर, २०२२

प्रति,

**अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग / उच्च व तंत्रशिक्षण विभाग /
माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

प्रधान सचिव
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 2698
दि. 8/9/22

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 7056 दि. 17/9/22
आवक क्र. 8797 दि. 20/9/22

**विषय** :- राष्ट्र पुरुष / थोर व्यक्तींचे जयंती दिन व अन्य राष्ट्रीय दिन व अन्य राष्ट्रीय दिन साजरे करणेबाबत.

**संदर्भ** :- सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. जपुती/प्र.क्र.११२/भाग-१/कार्या-२९. दि.०५ सप्टेंबर, २०२२.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन परिपत्रकाची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. सदर परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

(सु. ज. तुमराम)
कक्ष अधिकारी

प्रत : निवडनस्ती (कार्यासन-२९)

DR (estt.)
19/09/2022

12/09/2022

राष्ट्र पुरुष/थोर व्यक्तींचे जयंती दिन व
अन्य राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः जपुती २२२१/प्र.क्र.११२/भाग-१/कार्या-२९
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०५ सप्टेंबर, २०२२

**वाचा :- शासन परिपत्रक क्र.जपुती २२२१/प्र.क्र.११२/कार्या.२९, दि.३१ डिसेंबर, २०२१**

**शासन परिपत्रक :-**

सन २०२२ मध्ये राष्ट्र पुरुष/थोर नेत्यांची जयंती व राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम मंत्रालयात व सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालयात साजरे करण्याबाबतचे परिपत्रक दि.३१ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. सदर परिपत्रकामध्ये दर्शविलेले जे कार्यक्रम सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी, शनिवारी व रविवारी येत असले तरी, ते कार्यक्रम त्या-त्या दिवशी साजरे करण्यात यावेत.

३. राष्ट्र पुरुष /थोर व्यक्ती यांच्या जयंती दिनी मंत्रालयात माहिती व जनसंपर्क विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व डिस्प्ले बोर्डवर संबंधीत राष्ट्रपुरुष /थोर व्यक्ती यांची माहिती संपूर्ण दिवस प्रदर्शित करण्यात यावी.

४. राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांचे जयंती दिनी सर्व शाळा / महाविद्यालये येथे जयंती साजरी करतांना संबंधित राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांनी देशासाठी केलेल्या अनमोल कार्याचे सर्व शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, या अनुषंगाने व्याख्याने, निबंध स्पर्धा अशाप्रकारचे विविध कार्यक्रम शाळा तसेच महाविद्यालयात आयोजित करण्यात यावेत. जेणेकरुन भावी पिढीला राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांचे देशासाठी केलेल्या महान कार्याची माहिती होईल. तसेच जयंती दिन सुट्टीच्या दिवशी येत असल्यास शाळा / महाविद्यालये यांनी राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांच्या बाबत व्याख्याने, निबंध स्पर्धा अशाप्रकारचे विविध कार्यक्रम सुट्टीच्या आदल्या दिवशी आयोजित करणे उचित राहील.

५. विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी / आयुक्त, महानगरपालिका यांनी त्यांच्या विभागातील/जिल्हयातील /महानगरपालिकेतील सर्व शाळा / महाविद्यालयात सदर कार्यक्रम आयोजित करण्याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित करुन त्यांच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२२०९०६१५५३१३०२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JANA JIVA
VALVI

( ज. जि. वळवी )
उप सचिव

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई